आव्हान, परिस्थिती आणि दर्जा

फार वाईट परिस्थिती आहे राव, काय सांगायचे तुला!!!,
हे आजकाल एक कायम कानावर पडणारे वाक्य आहे. प्रत्येक तो किंवा ती काही आव्हाने झेलत, परिस्थितीशी सामना करत वाटचाल चालू असते. कधी तरी मात्र , " अरे किती कष्ट घेऊ,किती वाईट दिवस अजून काढायचे, ही प्रतिकूल परिस्थिती काही संपतच नाही माझी" अशी निराशा पण होते. काय माझेच नशीब बेकार आहे राव.
इथे प्रयत्न आणि संयम संपत आल्याचे सूर निघायला लागतात.

मला वाटते आयुष्य हे क्रिकेट च्या सामन्यासारखे असे समजावे, तुम्ही खेळ आहात, हातात बॅट आहे. परिस्थिती ही आजूबाजूला तुमचा झेल घ्यायला टपलेले क्षेत्ररक्षक आणि संकट म्हणजे येणारे अवघड चेंडू, त्यात संशयित पणे बाद करायला अंपायर रुपी नशीब. पण मला वाटते प्रत्येकाची आपली एक मॅच आहे, त्यात खंबीर पणे खेळपट्टीवर टिकून राहणे महत्वाचे आहे, कितीही अवघड बॉल का येईनात, फटकवायला, धावा काढायला जमत नसेलही, अरे पण नुसता टोलवावा प्रत्येक अवघड बॉल, कधीतरी परिस्थिती, गोलंदाज बदलतोच, आला सोपा। बॉल की सोडू नको, घुमवून मार, काढ सगळी कसर आणि हो सामनावीर आणि राखून ठेव तुझा दर्जा.

शेवटी काय चुकीचे खेळून अथवा वागून आउट होणे, बाद होणे याला काही अर्थ नाही, बॅट टाकायची नाही, कितीही परिस्थिती वाईट येवो, फलंदाजी करत राहायचे, आपला नेहमीचा दर्जा राखत, धोकादायक फटके/ निर्णय टाळत, पुढचा चेंडू सोपा येईलच हा विश्वास व संयम हवाच, कारण खेळात/ आयुष्यात त्या स्कोअर बोर्ड वर नाबाद दिसणे सर्वात महत्वाचे.
बाकी जो नाबाद; तो पुढच्या चेंडूला काहीही करू शकतो हे शाश्वत आणि आशादायी सत्य आहेच. त्यामुळे न थकता; बॅट न सोडता खेळपट्टीवर; त्याचप्रमाणे आयुष्यात सतत प्रयत्नशील राहणे हे एक महत्वाचे सूत्र म्हणा अथवा वाईट परिस्थितीतून तरून जाण्याची जणू गुरुकिल्लीच आहे.

© सपु, www.saarthbodh.com

**- सचिन कुलकर्णी**